| MHKO050024772020 | **संक्षिप्त दिवाणी दावा नं.१००/२०२० मधील निशाण १० वरील आदेश**<br><br>श्री. पवन रामअवतार नावंधर वि. लक्ष्मीनारायण यंत्रमाग औद्योगिक सह. संस्था. |
|---|---|

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३७ नियम ३ प्रमाणे बचावाची परवानगी मिळणेसाठी झालेला विलंब माफ करून मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ यांचे बंधु शरद यांना कोव्हीड १९ ची लागन झाल्यामुळे त्यांना आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर कोव्हीड १९ हेल्थ सेंटर एस.जी.यु., अतिग्रे, ता. हातकणंगले या ठिकाणी दि.१०/०९/२०२० रोजी दाखल केले होते. त्यामुळे प्रतिवादीच्या घरातील सर्वांना कॉरंनटाईन केले होते. तसेच कोव्हीड १९ मुळे संपूर्ण महाराष्ट्र मध्ये लॉकडाऊनची प्रक्रिया चालू होती. म्हणून प्रतिवादी यांना दि.१०/०९/२०२० रोजी नोटीस लागू झालेली असताना देखील हजर होता आले नाही. त्यामुळे बचावाची परवानगी देण्याकरिता अर्ज देण्यास १०२ दिवसांचा विलंब झाला आहे. तो विलंब जाणुनबाजून केलेला नाही. म्हणून झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास नि.१५ प्रमाणे म्हणणे दाखल करून प्रतिवादी यांची कथने नाकारलेली आहेत. वादी यांचे असे कथन आहे की, ऑक्टोबर नोव्हेंबर २०२० नंतर कोव्हीडचा प्रार्दुभाव कमी झाल्यामुळे जवळ जवळ सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये सुरू झालेले होते. त्यामुळे प्रतिवादी यांनी कोव्हीड या रोगाचा खोटा बनाव करून विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. तो नामंजूर होणे आवश्यक आहे.

**३.** दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. प्रस्तुतचा दावा हा संक्षिप्त दिवाणी दावा या स्वरूपातील आहे. संक्षितप्त दिवाणी दावा हा वेळेमध्ये निकाली काढणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज हा जानेवारी २०१९ पासून प्रलंबित आहे. प्रस्तुतच्या अर्जावर आदेश पारीत करण्यास अगोदरच उशीर झालेला आहे. प्रस्तुतच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या कारणावरून व प्रतिवादी यांना बचावाची संधी देण्याकरिता झालेला विलंब हा न्यायाच्या दृष्टीकोनातून माफ करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा ऑगस्ट २०२० मध्ये दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी वेळेमध्ये अर्ज न दिल्यामुळे विलंब झालेला आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजूर करून प्रतिवादी यांना बचावाची संधी देणे योग्य वाटते. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

**–: <u>आदेश</u> :–**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना बचावाचा अर्ज दाखल करण्याकरिता झालेला १०२ दिवसांचा विलंब रक्कम रू.५००/– वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

*(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)*

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2025.02.11 17:47:28 +0530

**दिनांक– ११/०२/२०२५**

**(श्री.एस.डी.वानखेडे)**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**